सकाळ

# भारती महाविद्यालयातील रासेयोचे शिबिर

**आर्णी, ता. १३ :** येथील राजकमल भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशीलाबाई राजकमल भारती विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे दत्तकग्राम तेंडोळी येथे सात दिवसीय विशेष हिवाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. निवृत्ती पिस्तुलकर होते. उद्घाटक म्हणून डॉ. एस. व्ही. वानखडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. विवेक सिरसकार, सरपंच सपना राठोड, निर्मलचंद तिवारी, परशाराम राठोड उपस्थित होते.

या शिबिराचे उद्घाटन डॉ. एस. व्ही. वानखडे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर विवेक सिरसकार यांनी 'राष्ट्रीय सेवा योजनेचे समाजातील कार्य आणि युवकांचे योगदान' या विषयावर प्रकाश टाकला. प्राचार्य पिस्तूलकर यांनीही मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना त्यांची ध्येय, उद्दिष्टे व कर्तव्य यांची जाणीव करून दिली. या शिबिरामध्ये विविध बौद्धिक सत्रांचे आयोजन करण्यात आलेले आहे. गावामध्ये स्वच्छता अभियान, मतदान जनजागृती, अंधश्रद्धा निर्मुलन, जलसंधारण, वृक्षारोपण व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. या शिबिरास श्री. दत्त प्रासादिक मंडळाच्या अध्यक्षा डॉ. किरण भारती, सचिव ॲड. सिद्धार्थ भारती यांनी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रा. डॉ. रुपाली टेकाडे यांनी केले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. संतोष आराडे , सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रतीक सोनोने, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रुपाली टेकाडे पुढाकार घेत आहेत.



**तेंडोळी : शिबिरात मार्गदर्शन करताना व मंचावर उपस्थित असलेले विविध क्षेत्रांतील मान्यवर.**

Nagpur, Yavatmal-Today
14/03/2023 Page No. 3

# भारती महाविद्यालयआर्णी येथे रासयो शिबिराचे उद्घाटन

आर्णी, दि.१२
(शहर प्रतिनिधी)

स्व. राजकमलजी भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशीलाबाई राजकमलजी भारती विज्ञान महाविद्यालय, आर्णी येथे दि. ११ मार्च २०२३ ला राष्ट्रीय सेवा योजनेचे दत्तकग्राम तेंडोळी येथील ७ दिवसीय विशेष हिवाळी शिबिराचे उद्घाटन झाले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य एन. ए. पिस्तूलकर, उध्याटक म्हणुन डॉ. एस. व्ही. वानखडे, प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. विवेक सिरसकार, रा.स.यो. क्षेत्रीय समन्वयक यवतमाळ हे होते. ७ दिवसीय होणाऱ्या या शिबिरामध्ये विविध बौद्धिक सत्राचे आयोजन करण्यात आलेले आहे. तसेच गावामध्ये स्वच्छता अभियान, मतदान जनजागृती, अंधश्रद्धा निर्मुलन, जलसंधारण, वृक्षारोपण आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.




आपल्या अध्यक्षिय भाषनात बोलताना डॉ. एन. ए. पिस्तुलकर यांनी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना त्यांची धेय, उद्दिष्ट व कर्तव्य याची जाणीव करून दिली. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. विवेक सिरसकार राष्ट्रीय सेवा योजनेचे समाजातील कार्य आणि युवकांचे योगदान यावर प्रकाश टाकला. या शिबिरास श्री दत्त प्रासादिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा डॉ. किरण भारती, सचिव ॲड. सिद्धार्थ भारती यांनी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. संतोष आराडे , सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रतीक सोनोने व महिला कार्यक्रमअधिकारी प्रा. डॉ.रुपाली टेकाडे यांनी परिश्रम घेत आहे.

# भारती महाविद्यालयाच्या रा.स.यो. शिबिराचे उद्घाटन : सात दिवसीय विशेष हिवाळी शिबिर




**आर्णी - / जनमाध्यम प्रतिनिधी -** स्व. राजकमलजी भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशीलाबाई राजकमलजी भारती विज्ञान महाविद्यालय, आर्णी येथे दि. ११ मार्च २०२३ ला राष्ट्रीय सेवा योजनेचे दत्तकग्राम तेंडोळी येथील ७ दिवसीय विशेष हिवाळी शिबिराचे उद्घाटन झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य एन. ए. पिस्तूलकर, उध्याटक म्हणुन डॉ. एस. व्ही. वानखडे, प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. विवेक सिरसकार, रा.स.यो. क्षेत्रीय समन्वयक यवतमाळ हे होते. ७ दिवसीय होणा-या या शिबिरामध्ये विविध बौद्धिक सत्राचे आयोजन करण्यात आलेले आहे. तसेच गावामध्ये स्वच्छता अभियान, मतदान जनजागृती, अंधश्रद्धा निर्मुलन, जलसंधारण, वृक्षारोपण आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. आपल्या अध्यक्षिय भाषनात बोलताना डॉ. एन. ए. पिस्तुलकर यांनी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना त्यांची धेय, उद्दिष्ट व कर्त्यव याची जाणीव करून दिली. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. विवेक सिरसकार राष्ट्रीय सेवा योजनेचे समाजातील कार्य आणि युवकांचे योगदान यावर प्रकाश टाकला. या शिबिरास डॉ. किरणताई भारती, अध्यक्ष श्री दत्त प्रासादिक शिक्षण प्रसारक मंडळ आर्णी व अॅड. सिद्धार्थ भारती, सचिव दत्त प्रासादिक शिक्षण प्रसारक मंडळ आर्णी यांनी शुभेच्छा दिल्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. संतोष आराडे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रतीक सोनोने व महिला कार्यक्रमअधिकारी प्रा. डॉ.रुपाली टेकाडे यांनी परिश्रम घेत आहे.

देशोन्नती

# रासेयो शिबिरात रस्ते सुरक्षा नियम व कायदे विषयक मार्गदर्शन




देशोन्नती वृत्तसंकलन...

**आर्णी** ▪ स्व.राजकमलजी भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशीलाबाई राजकमल भारती विज्ञान महाविद्यालय आर्णी येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे दत्तकग्राम तेंडोळी येथे चालु असलेल्या ७ दिवसीय शिबिरात दिनांक १३ मार्च २०२३ ला पवन पोटदुखे व . प्रशिक पांडे, सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक यवतमाळ यांनी रस्ते सुरक्षा नियम व कायदे यावर रा .से. यो. स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. वरील विषयावर बोलताना पोटदुखे सर यांनी वाहतूक नियम आणि कायदे याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. वाहतूक नियम हे जनतेच्या सुरक्षेसाठीच आहेत आणि अपघातात हेच नियम आपला बचाव करतात. त्यानी विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियमांचे पालन करण्याचे आव्हाहन केले. तसेच गाडीचे लायसन्स काढायचे, हेल्मेट वापरायचे, सीट बेल्ट लावायचे, गाडीविमा काढायचे सांगितले. त्यानंतर त्यानी विद्यार्थ्यांच्या प्रश्नाचे निरसन केले. या शिबिराच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राशिक पांडे , प्रमुख पाहुणे .सतिश तुळे हे होते. या कार्यक्रमास महाविद्यालयीन प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व गावकरी मंडळी उपस्थित होती. या कार्यक्रमाचे संचालन सागर बुटले बी. कॉम. भाग २ चा विद्यार्थी व आभार प्रदर्शन संजिवनी रेनापूरकर, बी. एस्सी. भाग २ यांनी केले. (**श.प्र**)

# रासयो शिबिरात रस्ते सुरक्षा नियम व कायदे यावर मार्गदर्शन

**आर्णी, दि.१३**
**(शहर प्रतिनिधी)**

स्व.राजकमलजी भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशीलाबाई राजकमल भारती विज्ञान महाविद्यालय आर्णी येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे दत्तकग्राम तेंडोळी येथे चालु असलेल्या ७ दिवसीय शिबिरात दिनांक १३ मार्च २०२३ ला पवन पोटदुखे व प्रशिक पांडे, सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक यवतमाळ यांनी रस्ते सुरक्षा नियम व कायदे यावर रा .से. यो. स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. वरील विषयावर बोलताना पोटदुखे यांनी वाहतूक नियम आणि कायदे याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. वाहतूक नियम हे जनतेच्या सुरक्षेसाठीच आहेत आणि अपघातात हेच नियम आपला बचाव करतात. त्यानी विद्यार्थ्यांना वाहतुकीचे नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले. तसेच गाडीचे लायसन्स काढायचे, हेल्मेट वापरायचे, सीट बेल्ट लावायचे, गाडीविमा काढायचे सांगितले. त्यानंतर त्यांनी




विद्यार्थ्याच्या प्रश्नाचे निरसन केले. या शिबिराच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री प्राशिक पांडे , प्रमुख पाहुणे श्री.सतेश तुळे हे होते.

या कार्यक्रमास महाविद्यालयीन प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व गावकरी मंडळी उपस्थित होती. या कार्यक्रमाचे संचालन सागर बुटले बी. कॉम. भाग २ चा विद्यार्थी व आभार प्रदर्शन संजिवनी रेनापूरकर, बी. एस्सी. भाग २ यांनी केले.

देशोन्नती

# महिला सशक्तीकरण आणि समाजातील समस्या विषयी मार्गदर्शन

देशोन्नती वृत्तसंकलन...

**आर्णी** ▪ स्व.राजकमल भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशीलाबाई राजकमल भारती विज्ञान महाविद्यालय आर्णी येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे दत्तकग्राम तेंडोळी येथे चालु असलेल्या ७ दिवसीय शिबिरात १३ मार्च २०२३ ला प्रशिक मुनेश्वर सचिव प्रेस क्लब आर्णी यांनी रासयो स्वयंसेवकांना आजच्या समाजातील समस्या आणि त्यावरील आपली भुमिका कशी असली पाहिजे हे सांगितले.



आजच्या समाजातील समस्या समजावुन सांगताना त्यानी विविध उदाहरण दिलेत. त्यानंतर त्यांनी महिला सशक्तीकरण यावर बोलताना मुलीनी निर्भय व्यावे असे सांगितले. मंचावर बोलताना त्यांनी युवकांना राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून कसा युवकांचा व्यक्तिमत्व विकास कसा होतो हे सांगितले. युवकानी आपले ध्येय साध्य करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करा असे सांगितले. या शिबिराच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. एस.एन. बोळे, प्रमुख पाहुणे डॉ. डी.पी. देशमुख हे होते.

या कार्यक्रमास रासयो स्वयंसेवक व गावकरी मंडळी उपस्थित होती.या कार्यक्रमाचे संचालन सागर बुटले बी. कॉम. भाग २ चा विद्यार्थी व आभार प्रदर्शन उमेश पारधी, बी. एस्सी. भाग २ यांनी केले.**(श.प्र)**

# भारती महाविद्यालय आर्णीचे रासेयो शिबिर तेंडोळी येथे संपन्न

**आर्णी - / जनमाध्यम प्रतिनिधी** - आर्णी स्व.राजकमलजी भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशीलाबाई रा. भारती विज्ञान महाविद्यालय, आर्णी येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे दत्तकग्राम तेंडोळी येथे चालु असलेले ७ दिवसीय विशेष हिवाळी शिबिर दिनांक १६ मार्च २०२३ ला संपन्न झाले. हे शिबिर दिनांक १० मार्च ते १६ मार्च २०२३ या दरम्यान आयोजित करण्यात आले होते.

यामध्ये २० मुले, ५५ मुली अश्या एकुण ७५ भारती महाविद्यालय आर्णीच्या विद्यार्थीनी सहभाग नोंदविला. या शिबिराच्या समारोपाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य एन. ए. पिस्तुलकर हे होते. प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ. एस. व्ही. वानखडे, संचालक दत्त प्रासादिक शिक्षण प्रसारक मंडळ आर्णी, किशोर रावते, गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती आर्णी, गावच्या सरपंचा सौ. सपना राठोड, परसराम राठोड ग्रा. प. सदस्य, सौ. विद्या कोलते, सौ. सुनीता चव्हाण व इतर ग्रामपंचायत सदस्य, रामधन पवार, निर्मलचंद तिवारी, मुख्यध्यापक, जि. प. उच्च प्राथमिक शाळा, तेंडोळी हे उपस्थित होते. किशोर रावते यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात बोलताना राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे एक सामाजिक काम करणारी आणि ग्रामविकासात हातभार लावणारी असुन या शिबिरार्थि विद्यार्थांनी ती जवाबदारी नीट आणि व्यवस्थित पाळली व शिबिरार्थि विद्यार्थांच्या शिस्तीचे अभिनंदन केले. शिबिराने विद्यार्थांच्या सर्वांगीण विकास होतो आणि समाजसेवा करायची भावना निर्माण होते असे ते म्हणाले. आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलताना प्राचार्य डॉ. एन. ए.



पिस्तुलकर म्हणाले की तुम्ही जे काही शिबिरामध्ये शिकले त्याचा उपयोग स्वतःच्या विकासासाठी करा आणि ते इतरांनाही द्या जेणेकरून समाजाला त्याचा उपयोग झाला पाहिजे. जे मोठे व्यक्ती झाले त्यांची घडवणुक ही येथूनच झालेली आहे असे सांगितले. या कार्यक्रमात उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून संकेत हर्सुलकर याचा गुणगौरव करण्यात आला. यावेळी महाविद्यालयीन प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर मान्यवर गावकरी मंडळी उपस्थित होती. या कार्यक्रमाचे संचालन संकेत हरसुलकर, बी. एस्सी. भाग ३ चा विद्यार्थी व आभार प्रदर्शन जागृती गंठाळे, बी. कॉम. भाग २ ची विद्यार्थीनी यांनी केले.